प्रेस नोट दिनांक १७/०२/२०२५.

**आंतरजिल्हा गुन्हेगाराकडून, घरफोडीचे ०२ गुन्हे उघडकीस, एकुण १४,३९,०००/- रुपयेचा मुद्देमाल जप्त सोलापूर शहर गुन्हे शाखेची कामगिरी.**

---

अ) दि.१६/०२/२०२५ रोजी तक्रारदार नामे- सुरेखा विठ्ठल तोडकरी, वय- ५२ वर्षे, व्यवसाय :- नोकरी, शिक्षीका, रा. विरनाह निवास, घर नं.७, बाटला चौक, जोडभावी पेठ सोलापूर यांचे तिसऱ्या मजल्यावरील राहते घराचे कोणीतरी अज्ञात इसमाने, दिवसा कुलूप तोडून, घरात प्रवेश करुन, बेडरुममधील फर्निचरचे कपाट तोडून, कपाटातील सुमारे १७७.७ ग्रॅम (१७.७ तोळे) वजनाचे दागिने, व रोख रक्कम रु. २३,०००/- चोरुन नेले. सदर घटनेबाबत जोडभावी पेठ पोलीस स्टेशन सोलापूर शहर येथे गुन्हा रजि नं. १०२/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३३१(३), ३०५(अ) प्रमाणे दिवसा घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ब) त्याचप्रमाणे, दि. १२/०२/२०२४ रोजी तक्रारदार महिला नामे- फराह रशीद शेख वय-५१ वर्षे, व्यवसाय :- शिक्षीका, रा. शाब्दी अपार्टमेंट तिसरा मजला फ्लॅट नं. १५, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर यांचे बंद घराचे कुलूप, दिवसा कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडून, घरात प्रवेश करुन, बेडरुममधील कपाटाचे लॉकर तोडून, कपाटातील सुमारे ३५.५ ग्रॅम (३.५तोळे) वजनाचे दागिने, व रोख रक्कम रु. १,००,०००/- चोरुन नेले. सदर घटनेबाबत जेलरोड पोलीस स्टेशन सोलापूर शहर येथे गुन्हा रजि नं. ७३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३३१(३), ३०५(अ) प्रमाणे दिवसा घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचे दोन्ही गुन्हे भरदिवसा घडले असल्याने, गुन्हे शाखेचे सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी घटनास्थळी भेट दिली होती. त्यानुसार, गुन्हे शाखेकडील सपोनि खेडकर यांचे तपास पथकातील पोकॉ.१३३३ इम्रान जमादार यांनी, अत्यंत सचोटीने व कौशल्याने, गुन्ह्याचे घटनास्थळाचे आजू-बाजूचे परिसराचे बारकाईने निरीक्षण करुन, तांत्रीक पुराव्याचे सहाय्याने चोरी करणारे संशयीत इसमास अधोरेखीत केले होते. त्यानंतर सपोनि शैलेश खेडकर व पथकातील अंमलदार यांनी सदर संशयीत इसमाची गोपनीयरित्या माहिती काढली.

त्यानंतर, दि. १५/०२/२०२५ रोजी सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकातील पोकॉ/इम्रान जमादार व पोकॉ/राजकुमार पवार यांना गोपनीय बातमीदारा मार्फत, वर नमूद दोन्ही ठिकाणी चोरी करणारे संशयीत इसमाचे नाव-ठिकाण्या बाबत माहिती मिळाली. त्यानुसार, **संशयीत इसम नामे- अमन फैय्याज शेख वय-१९ वर्षे, रा. कसाईवाडा, कोहिनुर सिटी, आग्रा रोड, कुर्ला वेस्ट, मुंबई सध्या रा. नई जिंदगी सोलापूर** यास सपोनि/शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने सापळा लावून, ते दागिने विक्री करण्याकरीता जात असताना, मुद्देमालासह दि.१५/०२/२०२५ रोजी अंत्रोळीकर नगर ते कुमठा नाका या दरम्यानचे, क्रिडा संकुल रोडवरील पोस्ट ऑफिस जवळून ताब्यात घेतले. त्यावेळी, त्याचे अंगझडतीत, (१) फिर्यादी सुरेखा विठ्ठल तोडकरी यांचे घरातून चोरलेले १७७.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम रु. १३,०००/- व (२) फिर्यादी फराह रशीद शेख यांचे घरातून चोरलेली रोख रक्कम रु.१०,०००/- असा एकुण १४,३९,०००/- (चौदा लाख एकोण चाळीस हजार रुपये) किंमतीचा ऐवज सविस्तर पंचनाम्याने हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे/वि.शा., श्री.राजन माने, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेकडील नेमणुकीचे स.पो.नि.श्री. शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार- संदीप जावळे, विनोद रजपुत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, सिध्दाराम देशमुख, अजय गुड, बाळासाहेब काळे यांनी केली आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
यांचे करीता.

